# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०९/२०२६ (मंगळवार )

.................................................................................................

## जानेवारी ते ऑगस्ट २०२६ मध्ये महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्हयांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्हयाला तिसरे स्थान प्राप्त

नागपूर ग्रामीण पोलिसांनी सातत्यपूर्ण व परिणामकारक रस्ते सुरक्षा उपाययोजनांद्वारे रस्ते अपघात व मृत्यूंमध्ये लक्षणीय घट साध्य केली आहे. सन २०२६ (जानेवारी ते ऑगस्ट ) सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघात आणि मृत्यूंमध्ये उल्लेखनीय घट नोंदविण्यात आली आहे. सन २०२६ (जानेवारी ते ऑगस्ट) या कालावधीत सन २०२५ च्या तुलनेत रस्ते अपघातांमध्ये १६ टक्क्यांनी, मृत्यूंमध्ये २२ टक्क्यांनी, तर जखमींच्या संख्येत ६ टक्क्यांनी घट झाली आहे. तसेच, महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये नागपूर ग्रामीण जिल्ह्याने तिसरे स्थान प्राप्त केले आहे. सन २०२६ (जानेवारी ते ऑगस्ट) या कालावधीत महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांमध्ये घट नोंदविणाऱ्या जिल्ह्यांमध्ये मध्ये नागपुर ग्रामीणला सातत्याने पहील्या पाच मध्ये स्थान प्राप्त झाले आहे.

देशातील रस्ते अपघातांच्या दृष्टीने उच्च प्राधान्य असलेल्या टॉप १०० जिल्ह्यांमध्ये नागपूर जिल्ह्याचा समावेश असून, या अनुषंगाने येथे सेव्ह लाईफ फाउंडेशन (**SaveLife Foundation**) यांच्या तांत्रिक सहकार्याने **Zero Fatality District (ZFD)** उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच जुलै २०२६ पासून **Dynamic Enforcement Action Plan** हा अभिनव उपक्रम **SaveLIFE Foundation** यांच्या तांत्रिक सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आला आहे.

सदर उपक्रम मा. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्यमंत्री कार्यालय (**CMO**) आणि मा. पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निरीक्षणाखाली प्रभावीपणे अंमलात आणला जात आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सर्वसमावेशक व डेटा—आधारित रस्ते सुरक्षा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, या उपक्रमामुळे रस्ते सुरक्षा उपाययोजनांना अधिक बळकटी प्राप्त होत आहे.

# MAHARASHTRA STATE

## Total Accidents Comparative " Descending Order "

| Sr. No | POLICE UNIT | JAN TO AUG 2025 | | | JAN TO AUG 2026 | | | COMPARATIVE % (JAN TO AUG 2025- 2026) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured | Total Accident | Total Killed | Total Injured |
| 1 | Navi Mumbai | 527 | 194 | 471 | 607 | 187 | 562 | 15 | -4 | 19 |
| 2 | MB-VV | 501 | 125 | 440 | 572 | 132 | 504 | 14 | 6 | 15 |
| 3 | Nasik City | 341 | 138 | 327 | 386 | 114 | 361 | 13 | -17 | 10 |
| 4 | Gadchiroli | 161 | 111 | 140 | 179 | 86 | 263 | 11 | -23 | 88 |
| 5 | Ratnagiri | 242 | 90 | 320 | 268 | 87 | 358 | 11 | -3 | 12 |
| 6 | **Thane City** | 656 | 151 | 630 | 726 | 175 | 666 | 11 | 16 | 6 |
| 7 | C.S.Nagar City | 419 | 121 | 360 | 460 | 140 | 404 | 10 | 16 | 12 |
| 8 | Latur | 539 | 254 | 357 | 584 | 286 | 374 | 8 | 13 | 5 |
| 9 | Raigad | 436 | 174 | 560 | 466 | 190 | 531 | 7 | 9 | -5 |
| 10 | Parbhani | 339 | 168 | 271 | 362 | 184 | 271 | 7 | 10 | 0 |
| 11 | C.S.Nagar R | 569 | 380 | 313 | 603 | 359 | 415 | 6 | -6 | 33 |
| 12 | **PCPC** | 855 | 268 | 762 | 906 | 245 | 892 | 6 | -9 | 17 |
| 13 | Palghar | 334 | 199 | 161 | 351 | 213 | 245 | 5 | 7 | 52 |
| 14 | Washim | 221 | 142 | 135 | 232 | 128 | 222 | 5 | -10 | 64 |
| 15 | Wardha | 251 | 123 | 264 | 261 | 124 | 207 | 4 | 1 | -22 |
| 16 | **Pune City** | 921 | 206 | 675 | 947 | 214 | 747 | 3 | 4 | 11 |
| 17 | Akola | 308 | 134 | 268 | 315 | 97 | 274 | 2 | -28 | 2 |
| 18 | Jalna | 467 | 256 | 453 | 476 | 258 | 433 | 2 | 1 | -4 |
| 19 | **Mumbai City** | 1691 | 249 | 1755 | 1719 | 229 | 1810 | 2 | -8 | 3 |
| 20 | **Pune R** | 1306 | 685 | 1023 | 1322 | 654 | 880 | 1 | -5 | -14 |
| 21 | **Nasik R** | 1035 | 658 | 1311 | 1046 | 607 | 1407 | 1 | -8 | 7 |
| 22 | Chandrapur | 515 | 241 | 406 | 520 | 219 | 476 | 1 | -9 | 17 |
| 23 | Dhule | 494 | 267 | 528 | 497 | 273 | 548 | 1 | 2 | 4 |
| 24 | Gondia | 235 | 121 | 161 | 236 | 135 | 171 | 0 | 12 | 6 |
| 25 | Beed | 545 | 309 | 357 | 544 | 260 | 340 | 0 | -16 | -5 |
| 26 | Thane R | 292 | 168 | 248 | 291 | 168 | 262 | 0 | 0 | 6 |
| 27 | Amravati City | 274 | 51 | 266 | 267 | 73 | 259 | -3 | 43 | -3 |
| 28 | Jalgaon | 606 | 314 | 530 | 587 | 336 | 421 | -3 | 7 | -21 |
| 29 | Hingoli | 300 | 169 | 249 | 289 | 161 | 252 | -4 | -5 | 1 |
| 30 | Satara | 673 | 352 | 498 | 643 | 326 | 475 | -4 | -7 | -5 |
| 31 | Sangli | 688 | 369 | 517 | 657 | 343 | 528 | -5 | -7 | 2 |
| 32 | Nanded | 620 | 340 | 369 | 589 | 328 | 312 | -5 | -4 | -15 |
| 33 | **Solapur R** | 835 | 486 | 883 | 793 | 479 | 816 | -5 | -1 | -8 |
| 34 | Sindhudurg | 130 | 59 | 210 | 123 | 55 | 142 | -5 | -7 | -32 |
| 35 | Amravati R | 339 | 206 | 267 | 320 | 202 | 288 | -6 | -2 | 8 |
| 36 | Buldhana | 468 | 264 | 429 | 440 | 241 | 326 | -6 | -9 | -24 |
| 37 | Bhandara | 270 | 121 | 259 | 251 | 108 | 267 | -7 | -11 | 3 |
| 38 | **Kolhapur** | 749 | 268 | 683 | 695 | 278 | 630 | -7 | 4 | -8 |
| 39 | Nandurbar | 239 | 143 | 296 | 221 | 125 | 309 | -8 | -13 | 4 |
| 40 | Solapur City | 170 | 58 | 153 | 155 | 56 | 119 | -9 | -3 | -22 |
| 41 | **Ahilyanagar** | 1393 | 626 | 1124 | 1188 | 531 | 906 | -15 | -15 | -19 |
| 42 | **Nagpur City** | 840 | 213 | 817 | 711 | 156 | 728 | -15 | -27 | -11 |
| 43 | Nagpur R | 668 | 310 | 689 | 559 | 241 | 648 | -16 | -22 | -6 |
| 44 | Dharashiv | 452 | 264 | 430 | 369 | 220 | 319 | -18 | -17 | -26 |
| 45 | Yavatmal | 612 | 314 | 403 | 460 | 263 | 281 | -25 | -16 | -30 |
| | TOTAL | 24526 | 10859 | 21768 | 24193 | 10286 | 21649 | -1 | -5 | -1 |

Page 1

# नागपूर ग्रामीण जिल्हयातील स्फोटक शोधक श्वान 'मार्शल' याचे दु:खद निधन नागपूर ग्रामीण पोलिसांकडून सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार

नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या बीडीडीएस पथकात (Bomb Detection and Disposal Squad) स्फोटक शोधक श्वान म्हणून कार्यरत असलेले 'मार्शल' (वय १० वर्षे ४ महिने) याचे आज दिनांक ०८/०९/२०२६ रोजी सकाळी ०७:३० ते ०८:०० वाजताच्या दरम्यान दु:खद निधन झाले. मार्शल याची प्रकृती खालावली होती. त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली.

मार्शलने नागपूर ग्रामीण पोलीस दलात स्फोटक शोधक श्वान म्हणून दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावली. विविध महत्त्वाचे बंदोबस्त, व्हीव्हीआयपी/व्हीआयपी सुरक्षा, संवेदनशील ठिकाणांची तपासणी, सण—उत्सव तसेच विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांदरम्यान स्फोटक शोध व सुरक्षा तपासणीच्या कामात त्याने मोलाची भूमिका बजावली. मार्शलने आपल्या सेवाकाळात कर्तव्य बजावताना उल्लेखनीय कामगिरी केली. मार्शल हा पोलीस दलासाठी केवळ एक श्वान नसून कर्तव्यनिष्ठ, विश्वासू आणि समर्पित सहकारी होता. त्यांच्या निधनाने नागपूर ग्रामीण पोलीस दलात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक गृह यांच्या उपस्थितीत पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण येथे मार्शल याच्यावर नागपुर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने मानवंदना देवुन सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे.



**श्वान 'मार्शल'**



## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०८/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन बुट्टीबोरी, एमआयडीसी बोरी, बेला, देवलापार, पारशिवनी च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग ( अतिरीक्त कार्यभार नागपूर उपविभाग) यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांच्यासह बुट्टीबोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी बुट्टीबोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च पोलीस स्टेशन चौक, बुट्टीबोरी प्रभाग क्रमांक २ मधील शिव अन्नपूर्णा मंदिर, मार्केट रोड, तैळ टाऊन, एमआयडीसी चौक या मार्गाने घेण्यात आला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :— श्री मयंक माधव, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग ( अतिरीक्त कार्यभार नागपूर उपविभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांच्या उपस्थितीत एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी एमआयडीसी बोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च खापरी मोरेश्वर चौक, ग्रामपंचायत बस स्टॅन्ड, अमर शाळा ते परत खापरी मोरेश्वर चौक या मार्गाने घेण्यात आला. तसेच टाकळघाट येथील बस स्टॉप चौक येथे दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन बेला** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांच्यासह बेला पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी बेला शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन देवलापार** :— श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांच्या उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन देवलापार यांच्यासह देवलापार पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी देवलापार शहरातील प्रमुख रस्ते,

बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्यासह पारशिवनी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी पारशिवनी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**




एक्स फिट




SML
MOBILE SHE VAN
सागर
हरिओम
किराणा & जनरल स्टोर्स
लक्ष्मी
रेस्टॉरन्ट
बस स्टॉप टाकळघाट


सांवरिया सेठ


पावर फ
9359917316, 8766971017
एशियनपेंट्स
asianpaints
MH31FY6924


वालय सिर्सी
जि.प.नागपूर


श्री पारसनाथ ट्रेडर्स
श्री पारसनाथ ट्रान्सपोर्ट
ताज बेकरी
MOBILE
REPAIR SERVICES
oppo
Infinix
NURI JAMA


POLICE
MAHARASHTRA POLICE
ATM

# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**दिनांक ०७/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन बेला** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांच्या उपस्थितीत आगामी पोळा, तान्हा पोळा व गणेशोत्सवाच्या अनुषंगाने शांतता समितीच्या पदाधिकारी व सदस्यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन नरखेड** :— आगामी गणेश विसर्जनाच्या अनुषंगाने तहसीलदार, नरखेड यांचे कार्यालय येथे सहा. पोलीस निरीक्षक श्री मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांच्या उपस्थितीत शासकीय अधिकारी, कर्मचारी व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत बांधकाम विभाग, महावितरण ,नगरपरिषद, अग्निशमन विभाग, महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी** :— पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुट्टीबोरी यांच्या उपस्थितीत आगामी गणेशोत्सव व सण—उत्सवांच्या अनुषंगाने साऊंड सिस्टिमचे चालक, मालक व ऑपरेटर यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस निरीक्षक श्री रणजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन काटोल यांच्या उपस्थितीत आगामी गणेशोत्सव व इतर सण—उत्सवांच्या अनुषंगाने गणेश मंडळांचे अध्यक्ष व सदस्य, डीजे मालक तसेच शांतता समितीच्या सदस्यांची स्वतंत्र बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन केळवद** :— सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिष ठाकुर प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन केळवद येथे आगामी सणोत्सव संदर्भात साऊंड सिस्टिमचे चालक, मालक व ऑपरेटर यांची बैठक घेतली.


भारत निवडणूक आयोग
विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६
Special Intensive Revision (SIR)
सहा. मतदार नोंदणी अधिकारी,
४८ काटोल विधानसभा मतदार संघ
तथा तहसीलदार, नरखेड




OPPO Reno15c 5G
7 September 2026 at 17:05






## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, २६९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०७/०९/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा नरखेड येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे नरखेड येथे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) राजू भार्गवराव डवरे, वय ६३ वर्ष, रा. नरखेड, ता. नरखेड जि. नागपूर २) कबीर रसूल शेख, वय ८२ वर्ष, रा. नरखेड, ता. नरखेड जि. नागपूर ३) राजेश वासुदेव निंबाळकर, वय ५५ वर्ष, रा. काटोल तालुका काटोल, जिल्हा नागपूर ४) मुन्नाजी रतनलाल रॉय, वय ६५ वर्ष, रा. नरखेड ता. नरखेड, जि. नागपूर ५) सुनील टीकाराम राऊत, वय ५५ वर्ष, रा. नरखेड, ता. नरखेड, जि. नागपूर ६) भारत मधुकर अरमरकर, वय ४५ वर्ष, रा. नरखेड, ता. नरखेड जि. नागपूर, ७) जयपाल रामसिंग राठोड, वय ५४ वर्ष, रा. बेलोना, ता .नरखेड यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि १) रोख रक्कम ३००/—रूपये, २) कँट बॉक्स रँडो कंपनीचे एकुण ०७ बॉक्स किंमती २३१०/— रुपये असा एकुण २६९०/— रूपयांचा मुद्द्देमाल जप्त करण्यात आला आहे.नमुद ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन नरखेड येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## गणपती उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर नागपुर ग्रामीण जिल्हयात गणेश स्थापना मार्ग ,विसर्जन मार्ग व विसर्जन स्थळाची करण्यात आली पाहणी

गणपती उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर स्थापना आणि विसर्जन मिरवणुकी दरम्यान वाहतूक कोंडी, गर्दी, अडथळे, वीजवाहिन्या, रस्त्यांची स्थिती तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित संभाव्य धोके आधीच ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करता याव्यात, यासाठी खालील पोलीस स्टेशन अंतर्गत अंतर्गत गणपती स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी करण्यात आली.

**पोलीस स्टेशन खापा :—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सदर पाहणी श्री. सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, सावनेर, पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी खापा यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्यासह  खापा अंतर्गत येणाऱ्या कन्हान नदी हनुमान घाट खापा येथे भेट दिली तसेच गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग, सहा. पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे , प्रभारी अधिकारी, जलालखेडा  पोलीस स्टेशन यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्या सह वर्धा नदीवरील विर्सजन स्थळ तसेच गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली.

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकासे, प्रभारी अधिकारी ,पोलीस स्टेशन नरखेड यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्यासह सावरगाव कोल्हापुरी बंधारा जवळील कुंड या  विर्सजन स्थळाची  तसेच  गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली.

**पोलीस स्टेशन बेला:—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक उमेश नासरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांनी  इतर प्रशासकिय अधिकारी यांच्यासह बेला

पोलीस स्टेशन हद्दीतील विर्सजन स्थळाची तसेच गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली.

**पोलीस स्टेशन बोरी :—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बोरी यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्यासह बोरी पोलीस स्टेशन हद्दीतील विर्सजन स्थळाची तसेच तसेच गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी करण्यात आली.

**पोलीस स्टेशन कोंढाळी:—** दिनांक ०८/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्या सह कोंढाळी पोलीस स्टेशन हद्दीतील विर्सजन स्थळाची तसेच तसेच गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी करण्यात आली.

**पोलीस स्टेशन वडोदा:—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सदर पाहणी श्री. शशांत एन एम , सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, यांनी इतर प्रशासकिय अधिकारी यांच्यासह वडोदा अंतर्गत येणाऱ्या विसर्जन स्थळाची पाहणी करून गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्गाची पाहणी केली

**रस्ता तपासणीदरम्यान विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील वाहतूक व्यवस्था, रस्त्यांची स्थिती, संभाव्य अडथळे, गर्दीची ठिकाणे, वीजवाहिन्या, प्रकाशव्यवस्था तसेच विसर्जन स्थळावरील आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला. स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींवर तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून वाहतूक, सुरक्षा, वीज, स्वच्छता आणि नागरिकांच्या सोयी सुविधांबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.**

खापा



वडोदा



नोंढाळी



बोरी



जलालखेडा



कोंढाळी



नरखेड



## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक ०७/०९/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता आरोपी नामे पंकज मुरलीधर ढोरे, वय ४२ वर्ष, रा. पेंच रोड वार्ड क्र. ०३, पारशिवनी, त. पारशिवनी, जि. नागपूर हा मौजा एरीकेशन विश्रामगृह परीसर नवेगाव खैरी शिवार येथे स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. त्यास त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

## उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी उपस्थित राहून आरोपींची केली तपासणी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०८/०९/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील २४ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना अधिक प्रभावी पणे राबविण्यात येत आहे. नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दर मंगळवार व शुक्रवार नियमितपणे घेण्यात येणाऱ्या आरोपी परेडमध्ये गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी स्वत: आरोपी परेडमध्ये उपस्थित राहून आरोपींची तपासणी केली. तसेच संभाव्य गुन्हेगारी हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवणे, संशयित व्यक्तींची माहिती अद्ययावत ठेवणे, प्रतिबंधात्मक कारवाई प्रभावीपणे राबविणे याबाबत पोलीस अधिकारी व अंमलदारांना आवश्यक त्या सूचना दिल्या. **एकुण ७३४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे २९ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३० आरोपी अशा एकुण ८९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २७ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १५ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन मोहपा येथे १६ आरोपी अशा एकुण १६० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे २१ आरोपी अशा एकुण ७५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३३ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण ११२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४० आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३२ आरोपी अशा एकुण १४९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.










ORBIT
WIRES & CABLES
पोलीस स्टेशन
दुरध्वनी क्रं: 07114-255078 जि. नागपुर








जनसंपर्क अधिकारी
नागपुर ग्रामीण जिल्हा